रविवार दि.२९ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : २७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com    Lokneta News - लोकनेता न्युज    8459977904    epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# जरांगेंच्या आंदोलनाचे बोलवते धनी दुसरेच:नरेंद्र पाटलांचे विरोधकांकडे बोट

## फडणवीसांच्या काळात एसईबीसीचे १२% आरक्षण मिळाल्याचा दावा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**सातारा | प्रतिनिधी**

मनोज जरांगे हे मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून वारंवार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांबद्दल द्वेष करत आहेत. यावर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी भाष्य केले आहे. जरांगे यांच्या आंदोलनामागे काही सत्तेबाहेरील सूत्रधार आहेत, हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर मनोज जरांगे यांच्या मनातील गैरसमज दूर होतील, असा दावा नरेंद्र पाटील यांनी व्यक्त केला आहे.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला एसईबीसीमधून १२ टक्के आरक्षण मिळाले, असा दावा देखील नरेंद्र पाटील यांनी यावेळी केला. मराठा समाजासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना तसेच सारथी सारखी संस्था काढली. या दोन्हींमधून मराठा समाजातील युवकांना फायदा झाला आहे. फडणवीसांनी एवढे चांगले काम करून देखील मनोज जरांगे त्यांच्याबद्दल द्वेष व्यक्त करत असतील, तर त्यामागे कोणी बोलावता धनी असला पाहिजे, असे नरेंद्र पाटील म्हणाले.नरेंद्र पाटील म्हणाले की, जे सत्तेत नाहीत ते मनोज जरांगेच्या आंदोलनामागचे सूत्रधार असू शकतो. मग ते कुणीही असू शकतात. काही अतृप्त आत्मा असतील ज्यांना मराठा समाजाचे प्रश्न झुलवत ठेवायचे असतील. मराठा क्रांती मोर्चाच्या आंदोलनावेळी भापज-शिवसेना सत्तेवर होती. त्यावेळी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस विराधी पक्षात होते. मात्र, सध्या एकनाथ शिंदे भाजपसोबत आहेत तर विरोधी पक्षात ठाकरेंचा गट आहे तो असू शकतो. अजित पवार सत्तेत आहेत तर शरद पवारांचा गट त्यामागे असू शकतो, असे म्हणत नरेंद्र पाटील यांनी विरोधकांकडे बोट दाखवले आहे.नरेंद्र पाटील म्हणाले की, मनोज जरांगे हे आंदोलनाच्या आधी महामंडळाबाबतच्या कामासाठी मला भेटायचे. त्यांची कामेही आम्ही करत होतो. ते नेहमी सामान्य कार्यकर्ता म्हणून न्याय मिळवण्यासाठी काम करत होते. आता त्यांच्या आंदोलनाचे चळवळीत रुपांतर झाले आहे. लोकसभा निवडणुकीत त्यांनी त्यांचे वेगळेपण दाखवले. आता आगामी विधासभा निवडणुकीत त्यांचे उमेदवार उभे करणार असे ते म्हणत आहेत. मात्र कुणाच्या विरोधात उभे करणार याबाबत त्यांनी स्पष्ट सांगितले नाही. या सगळ्यामागे देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य केले जात आहे. यामागे असणारे सूत्रधार मनोज जरांगेंच्या लक्षात आल्यानंतर त्यांच्या मनातील फडणवीसांबाबतचा गैरसमज दूर होईल, असेही नरेंद्र पाटील म्हणाले.

## जिल्हास्तरीय पर्यावरण मेळाव्यासाठी पर्यावरण प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-प्रमोददादा' मोरे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्ली मुंबई विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय पर्यावरण मेळावा,ट्रिगार्ड लोकार्पण,विद्यार्थी व शेतकरी गुणगौरव सोहळा अबितखिंड येथे आयोजित करण्यात आला आहे.हा कार्यक्रम रविवार दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते १ वा.ठिकाण अबितखिंड (मुक्ताबाई मंदिर),तालुका अकोले ,जिल्हा.अहमदनगर.या ठिकाणी असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.प्रमोददादा मोरे (अध्यक्ष) निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य हे असणार आहेत.



तसेच या कार्यक्रमासाठी पर्यावरणावर ज्यांनी आपले अनमोल असे कार्य केले आहे त्यांचा विशेष सत्कार व सन्मान या ठिकाणी होणार आहे या कार्यक्रमातील सत्कारमूर्ती सौ.वनश्रीताई मोरे-गुणवरे (सचिव),सौ.राजश्रीताई राजेंद्र आहेर,श्री.बाळासाहेब निवृत्ती ढोले,श्री.रामनाथ हौशीराम वाघचौरे,श्री.रामेश्वर साहेबराव चेमटे इत्यादी पर्यावरण प्रेमींचा या ठिकाणी विशेष कार्य करणाऱ्या लोकांचा मान्यवरांच्या हस्ते येथे सन्मान करण्यात येणार आहे.तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती.छायाताई राजपूत,श्री.तुकाराम अडसूळ,डॉ.प्रवीण गुणवरे श्री.प्रकाश केदारी,श्री.महेश पाडेकर,श्री.बाळासाहेब गाडेकर,श्री.वाळीबा पोपेरे, संजय कारखिले, संजय गायकवाड, विजय बोडखे हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत,तसेच या कार्यक्रमाचे आयोजक श्री.रामनाथ भोजने व श्री.चंद्रकांत भोजने यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले आहे.

निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या प्रेरणेने अबितखिंड या खेडेगावात जिल्हास्तरीय पर्यावरण मेळावा,ट्रीगार्ड लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे,तरी सर्व पर्यावरण प्रेमी व पदाधिकारी यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे व कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आव्हान कार्यक्रमाचे व पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष श्री प्रमोददादा मोरे यांनी केले आहे.

## नेरलीच्या दूषित पाणी दुर्घटनेची तात्काळ चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करा-प्रा.चव्हाण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव | प्रतिनिधी**

दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी नेरली तालुका नांदेड येथील जवळपास ३०० ते ४०० नागरिकांना दूषित पाणीपुरवठ्यामुळे जुलाब आणि उलट्या झाल्याची बातमी समजतात आज रोजी नेरली येथे *प्रा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी भेट देऊन गावकऱ्यांशी संवाद साधला आणि घडलेल्या घटनेची सविस्तर माहिती घेऊन खाजगी रुग्णालयात रुग्णांची भेट घेऊन तब्येतीची चौकशी केली त्यानंतर जिल्हा प्रशासनाकडे धाव घेऊन झालेल्या घटनेची चौकशी करून पाणीपुरवठा योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणा तसेच कंत्राटदार चौकशी करण्याची मागणी जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल कर्णवाल आणि



स्व.खा. वसंतराव चव्हाण यांचे निधन होऊन एक महिना उलटले पण हे दुःख बाजूला ठेवून लोकांच्या समस्या मिटविण्यासाठी पुढाकार घेणारे युवा नेतृत्व रवींद्र पाटील चव्हाण हे निश्चितच विविध घटकातील लोकांना खऱ्या अर्थाने न्याय देतील अशी सर्वांची अपेक्षा आहे.

निवासी जिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्याशी चर्चाकरून या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची विनंती रवींद्र चव्हाण यांनी केली आहे.

यावेळी अब्दुल सत्तार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर डीपी सावंत बबन बारसे महेश खेडकर दत्ता कोकाटे राजेश पावडे विठ्ठल पावडे निलेश पावडे शंकर शिंदे महाविकास आघाडीचे सर्व प्रमुख कार्यकर्ते गावातील मंडळी उपस्थित होते.

## कायदा सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांची गय केली जाणार नाही-पोलीस निरीक्षक पवार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**

दौंड पोलीस स्टेशन च्या पोलीस निरीक्षक पदी गोपाल पवार यांची नियुक्ती झाल्याने लागलीच दौंड तालुक्यातील पत्रकार यांचा परिचय करून घेतला तसेच अनेक विषयावर चर्चा करण्यात आली, यामध्ये अवैध धंदे,रोड रोमिओ,कर्कश आवाजात टू व्हीलर चालवणाऱ्या कारवाई करणे, महिलांना छेडछाड करणाऱ्या त्यांच्यावर कारवाई करणे,शाळेच्या परिसरामध्ये टुकार मुलांचा बंदोबस्त करणे,गोपाळवाडी रोडवरील वाहतुकीचा विषय हाताळणे,एमआयडीसी कडून येणाऱ्या बसेस मुळे वाहतुकीला होणारा परिणाम,कंपनीच्या बसेस वर असणाऱ्या ड्रायव्हरची चारित्र पडताळणी करणे, तसेच गोपाळवाडी रोड वरील सरपंच वस्ती या ठिकाणी असलेल्या बंद पडलेली पोलीस चौकी चालू करणे, रोज सकाळी भंगार गोळा करणाऱ्या गाड्या कर्कश साऊंड लावून व्यवसाय करतात त्यांच्यावर कारवाई करणे, बाबत आधी विषयावर चर्चा होऊन यासाठी योग्य तो निर्णय घेतला जाईल, तसेच सामाजिक सलोखा राखण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना त्यांच्याच भाषेत त्यांना धडा शिकवला जाईल,आणि कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांची अजिबात गय केली जाणार नाही.असे पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



## २ ऑक्टोबर रोजी रावण बाबा वाघमारे स्मृती व्याख्यानमाला

# प्रा.राजू सोनसळे यांचे 'आंबेडकरवाद आणि मातंग समाज' या विषयावर व्याख्यान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**

दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी अण्णा भाऊ साठे सभागृह सिडको (नविन नांदेड ) येथे रावण बाबा वाघमारे स्मृती व्याख्यानमालेचे सायंकाळी ५ वाजता आयोजन करण्यात आले असून 'आंबेडकरवाद आणि मातंग समाज' या विषयावर आंबेडकरी चळवळीतील युवा नेते प्रा. राजू सोनसळे हे व्याख्यान देणार आहेत. अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्स या संघटनेचे संस्थापक तथा साप्ताहिक दावेदार या वृत्तपत्राचे संपादक बा.रा. वाघमारे यांच्या वडिलांच्या स्मृती दिनानिमित्त रावण बाबा वाघमारे स्मृती व्याख्यानमालेचे दरवर्षी आयोजन केले जाते व्याख्यानमालेचे हे सोळावे वर्षे आहे. नवीन नांदेड सिडको येथील अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. गणपत वाडेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत, तर ॲड. चंद्रप्रकाश सांगवीकर यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमात सिडको, नांदेड आणि कंधार येथील डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास दररोज अभिवादन करणा-या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

यावेळी अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सचे प्रदेशाध्यक्ष डी.एस. वाघमारे, जयप्रकाश तथा पापा वाघमारे, डॉ. भास्कर औराळकर, सतीश पाटील बस्वदे, दत्ता पाटील खानसोळे, पी.बी. वाघमारे कोलंबीकर, वाय. जी. वाघमारे मरशिवनीकर, विलासदादा गजभारे, पत्रकार रमेश ठाकूर, प्रा. जी.एल. सूर्यवंशी, प्रा. ब. ना. गोईनवाड, प्रा. सी.एल. कदम, तुकाराम टोम्पे, एन. डी. गवळे, माधवराव आंबटवाड, आर.जे. वाघमारे, नागेश वाघमारे, पत्रकार राजेश भोळे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सखाराम गजले, गुणाजी बुचडे, सूर्यकांत शिंदे, बबन बुचडे, संदीप गायकवाड, पांडुरंग आंबटवाड, नामदेव काळे, श्याम कांबळे पान भोसीकर, धनाजी वाघमारे पानभोसीकर, प्रा. यशवंत गादेकर, रमेश सूर्यवंशी गोणारकर, एस.आर. मोरे, भगवान बावळे, चंद्रकांत बुचडे, संदीप सोनटक्के आदी परिश्रम घेत आहेत.

## नाशिक,पालघर, धुळ्यात ऑरेंज अलट

**मुंबइ (वृत्तसंस्था)**

नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आज अतिजोरदार पावसाचा अंदाज कुलाबा वेधशाळेने वर्तवला आहे. या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गमध्ये जोरदार, मुंबईत मध्यम, नगर, जळगावमध्ये हलका ते मध्यम, पुणे, साताऱ्यात जोरदार तर विदर्भात केवळ ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज हवामान विभागाच्या वतीने वर्तवण्यात आला आहे.

## चारोळी

अपेक्षाचं ओझं
डोईवर कशास हवं?
शोधीत जाऊ वाट वेगळी
गवसेल थोडं तरी नवं.

रंजना सानप
मायणी (सातारा)




सिडको येथील शिवाजी मा.व उ.मा. विद्यालयाच्या १४ वर्ष वयोगटातील मुलींच्या कबड्डी संघाची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत फायनल मॅच जिंकून विभागीय स्तरावर निवड झाली आहे.यावेळी अनिल गायकवाड व त्यांच्या मुलीचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला



कासारवाडी येथे बाईपण भारी देवा जिवंत देखाव्याचा प्रथम क्रमांक जय हो एंटरटेनमेंट निर्माता, दिग्दर्शक, लेखक -प्रकाशजी वाघमारे यांच्या हस्ते उत्कृष्ट कलाकार म्हणून सर्जेराव विलास उदागे यांना उत्कृष्ट कलाकार पुरस्कार मिळाला आहे. प्रमुख उपस्थिती समीर कदम (सैराट फेम) मेकअप आर्टिस्ट कार्यक्रमाचे सूत्रसंचालन -सर्जेराव उदागे यांनी केले.

## राज्याची निवडणूक एका टप्प्यात घ्या:राष्ट्रवादी काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या एका पथकाने शुक्रवारी महाराष्ट्रातील राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक एकाच टप्प्यात घेण्याची मागणी केली. राष्ट्रवादीने निवडणूक खर्चाची ४० लाख रुपयांची मर्यादा वाढवण्याचीही मागणी केली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वातील १४ सदस्यांचे एक पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. हे पथक आज व उद्या असे सलग २ दिवस राज्यातील निवडणूक तयारीचा आढावा घेणार आहे. या पथकाने सकाळी १० वा. विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत चर्चा केली. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसने आयोगाकडे राज्यातील विधानसभा निवडणूक एकाच टप्प्यात घेण्याची मागणी केली.

याविषयी राष्ट्रवादीचे मंत्री अनिल पाटील म्हणाले, आजच्या बैठकीत आम्ही निवडणूक आयोगापुढे काही महत्त्वाचे मुद्दे मांडले. महाराष्ट्र एक सुसंस्कृत राज्य आहे. त्यामुळे इथे एका टप्प्यात निवडणूक घेतली तरी चालते. यामुळे आम्ही निवडणूक आयोगापुढे राज्य विधानसभेची निवडणूक एका टप्प्यात घेण्याची विनंती केली. आयोगाने निवडणूक खर्चाची मर्यादा वाढवण्यावरही विचार केला पाहिजे. यासंबंधी आयोगाने जाहिरातीच्या बाबतीत आयोगाने सरकारी रेट धरला पाहिजे किंवा जाहिरातीवर होणारा खर्च निवडणुकीच्या खर्चातून वगळला पाहिजे.अनिल पाटील यांनी यावेळी आयोगाकडे आचारसंहितेचे गुन्हे दाखल करताना संबंधित उमेदवारांचे म्हणणे विचारात घेण्याचीही विनंती केली. निवडणुकीच्या प्रचारात अनेकदा उमेदवारांकडून आचारसंहितेचे उल्लंघन केले जाते. त्यामुळे त्यांनी केलेली ही मागणी अत्यंत महत्त्वाची आहे.सरीकडे, निवडणूक आयोगाचे पथक शनिवारी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक यांच्याशी संवाद साधणार आहे. या प्रकरणी प्रशासनाची प्रशासकीय तायरी, पोलिसांकडून कायदा सुव्यवस्थेची परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर आयोगाचे पथक पत्रकार परिषद घेणार आहे. त्यात विधानसभा निवडणुकी संबंधी एखादी सकारात्मक घोषणा होण्याची शक्यता आहे.उल्लेखनीय बाब म्हणजे २८८ सदस्यीय महाराष्ट्र विधानसभेच्या यंदाच्या निवडणुकीकडे अवघ्या देशाचे लक्ष लागले आहे.




# अंदमान च्या बेटा वरून

लेखक ❋ धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर



**अमरनाथ यात्री संघाचे अध्यक्ष धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या सिद्धहस्त लेखन शैलीतून रोमांचकारी असणारा अंदमान टूर चा रोज चा वृत्तांत याच ठिकाणी दररोज प्रसिद्ध करण्यात येणार आहे. कृपया वाचकांनी प्रतिसाद द्यावा ही विनंती. – संपादक**

(भाग ४)

आज आम्हाला दोन बेटांना भेटी द्यायच्या असल्यामुळे दुपारचे जेवण उशिरा मिळेल अशी सूचना संदीप मैंद यांनी दिली होती.त्यामुळे सकाळी भरपेट नाश्ता करून आम्ही एसी टेम्पो ट्रॅव्हल्स ने निघालो.माउंट हॅरिएट धक्क्यावर पोंहचण्यासाठी अर्धा तास लागला.येथून पुढचा प्रवास स्पीड बोटीने करायचा होता.दहा दहा चे सहा ग्रुप केले.प्रत्येक स्पीड बोटी चे नाव वेगवेगळे होते.मी ज्या मध्ये बसलो तिचे नाव होते व्हाईट प्यारोट.लक्षात रहावे या साठी मी त्याचे भाषांतर केले सफेद तोता.हेच नाव दिवस भर कायम झाले.स्पीड बोटीवरून आसपासचे दृश्य पोर्ट्रेट सारखे अप्रतिम दिसत होते.विधात्याची ही कला निर्मिती मनाला आल्हादायक करत होती. फोटोसेशन करत प्रवाससुरू होता.मनाला तरुण करणारी निसर्गाची निर्मिती पाहून इथे येणाचे सार्थक झाल्याचा आनंद मिळाला.

रॉस आयलंड ला पंधरा मिनिटात पोंहचलो. रॉस हे ब्रिटिश अधिकाऱ्याचे नाव.मोदी सरकार ने एका फटक्यात त्याचे नाव बदलले ते म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस द्वीप. या बेटावर फेरफटका मारण्यासाठी बॅटरी कार ची व्यवस्था आहे. पायी सुद्धा जाता येते. पण वेळेचे बंधन असल्यामुळे आम्ही बॅटरी कारचा पर्याय निवडला. प्रत्येकी ८० रुपये देऊन आठ जण एका बॅटरी कार मध्ये बसलो. बॅटरी कारचा चालक गाईडची देखील भूमिका निभावत होता.आपल्या चलनातील जुन्या २० रूपयाच्या नोटेवर जे दृश्य आहे ते प्रत्यक्ष बघण्याचा आणि त्याच ठिकाणा वरुन ते ऐतिहासिक दृश्य टिपण्याचा योग दुर्मिळच.अतिशय सुंदर असे तेथील गार्डन आणि फुलांचे रंग पाहून तर मनाला तरतरी येते. आपल्याकडील फुले तर रोज पाहतो पण इथे फुलांचे नंदनवन भरल्या सारखे भासते. निसर्गाचे आभार मानत एका तासाच्या भेटीत जितके जास्त डोळ्यात आणि मोबाईलच्या कॅमेरात साठविता येईल तितके साठवित होतो.एकेकाळी ब्रिटीश सत्तेचे प्रमुख केंद्र असलेले हे बेट. या सर्व समुहाची ही राजधानी असल्यामुळे सर्व राज्यकारभार येथूनच चालायचा. काळाचा महिमा अगाध असतो. ब्रिटिश साम्राज्यात सूर्य कधी मावळत नाही असे म्हणायचे. पण तीच ब्रिटिशांची राजधानी आता जुन्या काळातील अवशेष बनुन राहिली होती. येथील पोस्ट ऑफिस, सैनिकांचे ब्यारेक, अधिकाऱ्यांचे बंगले, चर्च, धान्याचा ची कोठारे या सर्व जुन्या इमारती जवळजवळ मोडकळीस आलेल्या आहेत. 'स्मृतिका' नावाच्या एका छोट्या संग्रहालयात या बेटांशी संबंधित ब्रिटिशांची छायाचित्रे आणि इतर पुरातन वस्तू जतन केलेल्या आहेत.

अंदमानला आल्यानंतर एका व्यक्तीला भेटण्याची खूप उत्सुकता होती.ती एक द्वीपशिखाइथेच तिच्या कुटुंबासह राहते. आणि तिच्या कुटुंबात कोण कोण आहेत ठाऊक आहे का? हरणं, मोर, खारी, चिमण्या आणि बरेच कुणी कुणी.

अनुराधा राव असं त्या द्वीपशिखेचं नाव.अनुराधा राव इथे आलेल्या पर्यटकांना प्रायव्हेट गाईड म्हणून मार्गदर्शन करतात. संदीपजी ने तिला आवर्जून बोलावले.अनुराधा राव ने ह्या बेटाची माहिती सांगितली .इतिहास समजावून सांगितला. इथेच राहण्याच्या मोठ्या झालेल्या अनुराधांनी प्राण्यांनाच आपले कुटुंब मानले.शिकारीच्या विरोधात तिने आपले जीवन वाहून घेतले. त्यामुळे सर्व प्राणी तिच्या आवाजाने एकत्र येतात .तिने प्रत्येक प्राण्याचे नामकरण केलेले आहे. ज्याचे नाव घेतले तो लगेच तिच्यासमोर येतो.आम्ही या प्राण्यांना हात लावला. त्यांना प्रेमाने खाऊ घातले,कुरवाळे.प्राण्यांच्या सोबतीने आयर्लंड बघण्याचा अनोखा आनंद दुर्मिळ असून देखील आम्हाला घेता आला. तिच्या प्राणी प्रेमाला सहकार्य मिळावे म्हणून पाच हजार रुपयाची अल्पशी मदत तिला केली. एक तासाचा टाईम बघता बघता संपला. लाईट हाऊस व इतर ठिकाणी फोटो काढून आम्ही इथल्या अविस्मरणीय स्मृती जतन केल्या.

तिथून पुढे आम्ही परत स्पीड बोट ने नॉर्थ बे बीच ला गेलो. या बीचचे देखील नाव भारत सरकारने बदललेले आहे. वॉटर स्पोर्ट साठी हे बेट प्रसिद्ध आहे. समुद्राच्या पाण्याखालील स्कुबा डायव्हिंग आणि सी वॉक ज्यांनी केला त्यांना दुसऱ्या जगात जावून आल्याचा अनुभव आला. तो शब्दात व्यक्त करणे कठीणच. अद्भुत आणि पाण्यातील जीवसृष्टी प्रत्यक्ष डोळ्याने पाहता येत होती. हा सारा अनुभव फारच सुंदर व न विसरता येणारा होता.समुद्र तळातील विविध जीवन आणि जीव सृष्टीला प्रत्यक्ष स्पर्श करत डोळ्याचे पारणे फेडणारा एक विलक्षण अनुभव आम्ही घेतला. काहींनी पॅराग्लाइडिंग, पॅरा सायकलिंग, स्पीड बोट सोबत मस्त मजा केली. ज्यांचे वय ६० पेक्षा अधिक होते त्यांच्यासाठी एक विशेष ॲक्टिव्हिटी होती ती म्हणजे सबमरीन सफारी. एक तासाच्या या सफारीमध्ये बोटीचा अर्धा भाग समुद्राच्या पाण्यात असतो आणि वरचा भाग समुद्राच्या वर. जिथे पाणी उथळ असते आणि समुद्रातील जीवसृष्टी मोठ्या प्रमाणात आढळते त्या ठिकाणी आम्हाला नेण्यात आले. रंगी बिरंगी मासे व विविध आकाराचे आकर्षक प्रवाळ बघताना खूप मजा आली. त्यातच आम्हाला ऑक्टोपस दिसल्यामुळे आनंद द्विगुणीत झाला. परतीच्या प्रवासात डेकवर म्युझिक सिस्टीम सुरू होती. मी सगळ्यांना डान्स करण्याचा आग्रह केला. आमच्या सोबत असलेली गाईड अपर्णा हिने इतका जबरदस्त डान्स केला की, सर्वजण खुश झाले. वय विसरून सर्वांनी डान्सचा आनंद लुटला. समुद्राच्या लाटांवर गाण्याच्या तालात नाचत असताना सर्वांना आपले बालपण आठवले. दुपारी अडीचच्या सुमारास आम्ही हॉटेलला परतलो. भरपूर एक्झर्शन झाले असल्यामुळे कडाडून भूक लागली होती. सर्वांनी स्वादिष्ट भोजनावर यथेच्छ ताव मारला.

आजची संध्याकाळ काही खास होती. सर्वांना चौथ्या मजल्यावर टेरेसवर बोलावून रंगारंग कार्यक्रम घेतला. प्रत्येकाने आपल्या अंगात असलेले कलागुण दाखविले. यावेळी प्रत्येक टुरिस्ट वर मी केलेले विनोद सर्वांना खूप आवडले. एक तासासाठी ठेवलेला हा कार्यक्रम अडीच तासानंतर नाईलाजस्त बंद करावा लागला. आमच्यासोबत टूरमध्ये आलेल्या मंजू चौधरी यांचा आज वाढदिवस होता. त्यांच्या माघारी आम्ही केक आणला व तो त्यांच्या हस्ते कापून वाढदिवस साजरा केला. त्यामुळे त्या एकदम खुश झाल्या. रात्रीच्या जेवणात नॉनव्हेज वाल्यांसाठी करण्यात आलेली फिश फ्राय अतिशय चविष्ट होती. शाकाहारी लोकांचे जेवण देखील सर्वांना आवडले. उद्याच्या सूचना देऊन आजची आमची मैफल संपली. (क्रमशः)

# माजी आ.धोंडे यांची चाढ्यवर मुठ,केली ज्वारीची पेरणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**




माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या शिरूर तालुक्यातील गावभेट दौऱ्याला नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.सध्या पावसाने काही भागात उघडीप दिली आहे त्यामुळे शेतकरी मशागत व पेरणीच्या कामात गुंतले आहेत.दौऱ्याच्या निमित्ताने हनुमान वाडी येथे शेतात शेतकरी पेरणी करीत असताना खरोखरच शेतकरी पुत्र असलेले आणि शेतीची आवड असलेल्या मा.आ.भिमराव धोंडे यांनी शेतात जाऊन चाढ्यावर मुठ धरुन ज्वारीची पेरणी केली आणि खरोखर शेतकरी पुत्र असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

याबाबत अधिक माहिती अशी की,लवकरच होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने माजी आ. भीमराव धोंडे यांनी मतदारसंघात गेल्या दिड महिन्यापासून गाव भेटीचा दौरा सुरू केला आहे.

मतदारसंघातील सर्व सामान्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी व संवाद साधण्यासाठी शनिवारी दिनांक २८ सप्टेंबर रोजी जनसंपर्क अभियाना अंतर्गत शिरूर कासार तालुक्यातील जाटवड, बहीरवाडी,मानूर,हनुमानवाडी, बडेवाडी, बारगजवाडी,शेरेवाडी, उंबरमुळी,लोणी,मांगेवाडी, वारणी,उत्तमनगर,दहिवंडी, रूपूर,गोमळवाडा या गावांचा दौरा केला.ठिकठिकाणी नागरीकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तसेच तोफा वाजवत आणि वाजतगाजत स्वागत केले. वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या बैठकीत पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की,गावभेटी दौऱ्याच्या गावात गेल्यानंतर ग्रामस्थ मला विचारतात की,रस्ते व इतर विकास कामातील कमिशनची काय भानगड आहे.वरती मंत्र्याना पैसे द्यावे लागतात का ? त्यावर तुम्ही त्यांनाच विचारा असे सांगून मी कधीच कमिशन घेतले नाही.प्रत्येक विकास कामात दहा ते पंधरा टक्के कमिशन घेतल्यामुळे कामाची गुणवत्ता राहत नाही असे लोक सांगतात.मी वीस वर्षे विधानसभा सदस्य होतो कधीही कोणाकडून कमिशन घेतले नाही.यापुढे चुकीचे काम करणाऱ्या माणसांच्या पाठीमागे जाऊ नका.चांगले काम आणि गुणवत्तेला मी प्राधान्य देतो, लोकांनी गुणवत्ता पहावी गुणवत्तेच्या दृष्टीने मी मतदार संघात प्रथम क्रमांकावर आहे. मला सहकार्य करा तुमच्या उपयोगी पडणारा माणूस आहे असे भावनिक आवाहन त्यांनी केले. मतदारसंघातील धनगर समाजाच्या मुलांकरीता आष्टी येथे वसतीगृह सुरू केले आहे.लोकसभा निवडणुकीत मा. पंकजाताई मुंडे यांच्या साठी सर्वांनी प्रयत्न केले पण आपल्याला यश आले नाही. आतापर्यंत मतदारसंघातील ७० टक्के गावांचा दौरा केला आहे. उर्वरित गांवात लवकरच जाणार आहे.दौऱ्याच्या निमित्ताने शिरूर तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांसह भाजपा युवा मोर्चा बीड जिल्हा सरचिटणीस डॉ. अजयदादा धोंडे,जि.प.सदस्य रामदास बडे,माजी जि.प.सदस्य दशरथ दादा वनवे, उद्योजक लिंबासेठ दादा नागरगोजे,माजी जि.प.सदस्य अशोक सवासे,सरपंच अशोक पाखरे,सरपंच ज्ञानदेव केदार, उपसरपंच अर्जुन बनसोडे,माजी सरपंच विठ्ठल वनवे,अमर माळी, कारभारी कदम,अशोक खोले, रासपा तालुकाध्यक्ष शाम महानोर,बाळासाहेब ढाकणे,सरपंच ज्ञानदेव केदार, शिवाजी बडे,इजि.एम.एन.बडे, डॉ.भास्कर बडे,महारुद्र खेडकर व इतर उपस्थित होते.जाटवड येथील लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून माजी आमदार भीमराव धोंडे यांनी अभिवादन केले तसेच हनुमानवाडी येथे शेतात शेतकरी पेरणी करीत असताना माजी आमदार भीमराव धोंडे हे देखील एक निष्ठावान शेतकरी असल्याने पाभरीवर मुठ ठेऊन ज्वारीची पेरणी केली.विविध ठिकाणच्या कार्यक्रमास शेरखान पठाण, अंकुशराव पाखरे,भारत पाखरे, पोपटराव सिरसाठ,अर्जुनराव पाखरे,मोहन महाराज सुरसे, किसनराव बेळगे,संभाजी बडे, गोविंद बेळगे,विलास पाखरे, संभाजी शिंदे,हनुमंत सुरसे, खलंदर पठाण,अजिनाथ गवळी,साहेबराव बडे,अर्जुनराव बडे,प्रशांत बडे,पांडुरंग बडे, अशोक बडे,काकासाहेब भोसले,जगदीश ढाकणे,शेरखान पठाण,उपसरपंच ज्ञानोबा देवकाते,कृष्णा सरगर,अभिषेक महारनोर,अभिलाष गाडेकर , किरण महानोर,भाऊराव शेंडगे, बाजीराव शेंडगे,शाहुराव शेंडगे, अशोक सरगर,बाळु शेंडगे, शाहुराव सरगर,शहादेव साबळे, बंडू साबळे,विठ्ठल ठोंबरे,संजय ठोंबरे,वसंत लोखंडे,काशिनाथ नरुटे,माजी सरपंच बाबासाहेब आघाव,गहिनीनाथ बारगजे, नवनाथ बारगजे,ड.महादेव बारगजे,वैभव बडे,लक्ष्मण आघाव,रामदास बारगजे, नंदकुमार बारगजे,ज्ञानदेव आघाव,शहादेव बडे,डॉ. बारगजे,संदीप बारगजे,प्रल्हाद बडे,शिवाजी बडे,माजी सरपंच शिलाताई आघाव,माणिकराव बडे,मारुती बडे,महादेव बडे, संजय जगताप,आसाराम बडे, भागवत बडे,रमेश सिरसाठ, शिवाजी बुधवंत,विक्रम बडे, दिपक बडे,मनोज शेलार, रावसाहेब तेळकर,अनिल तेळकर,आकाश जाधव,दत्ता तेळकर,अर्जुन तेळकर, पत्रकार साळवे,हनुमंत बडे, उपसरपंच ज्ञानेश्वर भुंबे,विठ्ठल येवले,राजेंद्र येवले,प्रभाकर पवार,दत्तो आप्पा सुरे, ह.भ.प.बारगजे महाराज,मधुकर जायभाये,काकासाहेब जेधे, बाबासाहेब वीर,ज्ञानोबा काकडे, बाळासाहेब साळवे,पत्रकार सतीश मुरकुटे,मनोज परदेशी, चांगदेव बापू सुरे,अशोक गर्जे, विलास कातखडे,रमेश सिरसाठ,सावळेराम जायभाये, रमेश सिरसाठ,शहाजी येवले, विलास पवार,माऊली पवार, महादेव आंधळे,प्रभास पवार, बिभिषण बहादुर्गे,छत्रु नेटके व इतर उपस्थित होते.

# मा.प्राचार्य श्री केशवरावजी गावंडे

लोकनेता न्युज नेटवर्क



गावंडे सरांचा ।।
अमृताचा क्षण ।।
आनंदले मन ।।
जन्मदिनी।।
गावंडे सरांना ।।
हार्दिक शुभेच्छा ।।
मनस्वी सदिच्छा ।।
जन्मदिनी ।।
हाडाचे शिक्षक ।।
श्री गावंडे सर ।।
जय पथावर ।।
शाळा कार्य ।।
शिक्षणक्षेत्रात ।।
उत्तुंग भरारी ।।
शिक्षणाची वारी ।।
शाळा दारी ।।
विद्यार्थ्यांचे खरे ।।
एक वारकरी ।।
नेक कार्य करी ।।
केशवजी ।।
कार्यपूर्तीसाठी ।।
ध्यास ते धरीत।।
अभ्यास करीत।।
जीवनात ।।
लहान की मोठा ।।
असोत ते कोणी ।।
प्रेमळ ती वाणी ।।
सदोदित ।।
केशवरावजी ।।
श्री गावंडे सर ।।
जोडतो मी कर ।।
जन्मदिनी ।।

**डॉ.पंजाबराव देशमुख वाड्.मय पुरस्कार प्राप्त अभंगकार**
**प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले,**
**रुक्मिणी नगर,अमरावती.**
**भ्र.ध्व. :८००८७७४८६०९**

# आष्टी मतदार संघात आता घोटाळेबाज पुढाऱ्यांना जनतेने थारा देऊ नये–ॲड.जाधव

## संपर्क दौऱ्यात ॲड.नरसिंह जाधव यांच्या उमेदवारीचे गावा गावातून होतेय स्वागत







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

बीड जिल्हातील आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदारसंघातून आतापर्यत जनतेने निवडून दिलेल्या प्रस्थापित पुढाऱ्यांनी केवळ आपला स्वतःचा आणि आपल्या कार्यकर्त्यांचा विकास केला असून कुणी देवाच्या जमिनी ताब्यात घेऊन घोटाळा केला,जिल्हा परिषद,पंचायत समिती,नगर पंचायत मधील शासकिय योजनांना कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करून आणायचा आणि आपल्याच कार्यकर्त्यांना गुत्तेदारी देऊन बोगस,थातुर मातुर काम करून पैसे उचलून घेऊन योजनांचा बट्ट्याबोळ करून लोकांच्या पैशांवर डल्ला मारत आपली घरे भरण्याचे काम करीत आहेत.तर कुणी आणखी काही लफडे करण्याचे पाप करून पुन्हा साव म्हणून आम्हीच मतदार संघाचा विकास करूम्हणून जनतेसमोर येत आहेत.अशा घोटाळेबाज पुढाऱ्यांना जनतेने आता थारा देऊ नये असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार गटाच्या विधी सेलचे राज्य उपाध्यक्ष ड नरसिंह जाधव यांनी केले आहे.

आष्टी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार गटाच्या विधी सेलचे राज्य उपाध्यक्ष ड नरसिंह जाधव हे निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असून, त्यांनी मतदार संघात संपर्क दौरा सुरु केलेला आहे.तसेच आष्टी येथे संपर्क कार्यालय सुरु केल्यामुळे थेट जनसामान्यांच्या भेटी गाठी वाढल्या आहेत. त्यांच्या उमेदवारीचे गावोगावच्या नागरिकांकडून उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात येत आहे.

जाधव यांनी आष्टी तालुक्यातील कडा,धामणगाव, डोईठाण, देवीनिमगाव,कोहिनी, किन्ही, दौलावडगाव ,केरुळ,साले वडगाव,धानोरा,कर्डिले वस्ती येथे जाऊन नागरिकांच्या भेटी घेऊन नागरिकांच्या वैयतिक,सामाजिक,राजकिय प्रश्नावर चर्चा करून,गावातील रस्ते,पिण्याचा पाण्याचा प्रश्न, शिक्षण,आरोग्य सेवा आदी समस्याबाबत चर्चा केली. या दौऱ्यात बोलताना ड जाधव म्हणाले की,आष्टी मतदारसंघात प्रस्थापित पुढाऱ्याच्या विरोधामध्ये वातावरण असून,या पूर्वी तीन चार वेळा निवडून आलेल्या लोकप्रतिनधींकडून केवळ स्वतःच्याच संस्था वाढवून आपला आणि आपल्या कार्यकर्त्यांचा विकास केला आहे. कोट्यवधी रुपयांच्या विकास निधी येऊनही मतदार संघ भकास आहे. केवळ आपला आणि आपल्या बगलबच्च्याचा विकास करून सर्व सामान्य जनतेला मूलभूत सुविधापासून दूर ठेवन्याचे पाप केले आहे. मतदार संघाच्या विकासासाठी एकही मोठा प्रकल्प आणलेला नाही.आहे ते कारखाने बंद पडला आहे.शासकीय योजनासाठी कोट्यवधीचा निधी मंजूर होऊन येतो मात्र या प्रस्थापित पुढाऱ्यांच्या बगलबच्चे थातूरमातूर कामे करून आलेला निधी आपल्याच घश्यात घालतात आणि या भ्रष्टाचारी कार्यकर्त्यांची पाठराखण हे लोकप्रतिनिधी करतात.याच पैसा आणि सत्तेच्या माध्यमातून मतदार संघात भ्रष्टाचार, गुंडगिरी,आणि दहशतीचे वातावरण निर्माण करून राजकारण केलं जातं.या दहशत आणि भ्रष्टाचाराला जनता वैतागली आहे.आता जनतेने सावध होण्याची गरज असून घोटाळे बाज पुढाऱ्यांना येणाऱ्या निवडणूकीत धडा शिकवून नविन चेहऱ्याला संधी द्यावी असे आवाहन ड जाधव यांनी केले.मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी सुरू केलेले आमरण उपोषण त्याला पाठिंबा म्हणून धामणगाव ता.आष्टी येथील दोन युवक अशोक पोकळे व साईनाथ पोकळे यांनी गेल्या चार दिवसापासून आमरण उपोषण सुरू केले होते.दि. २५/०९/२४ रोजी ४ वा. शासकीय अधिकारी व प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत देऊन युवकांना उपोषण स्थगिती करण्याची विनंती करून उपोषण स्थगिती करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अँड.नरसिंह जाधव,बाळासाहेब निकम, विजयकुमार गाडवे यांच्यासह मराठा बांधव उपस्थित होते.

# भाजप लोहा विधानसभेची जागा शंभर टक्के जिंकणार-माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर

## विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार-लोहा तालुक्यांत शेकडो कोटींचा निधी दिला आहे.अनेक विकास कामे केली आहेत.कंधार व लोहा तालुका माझी जन्मभूमी व कर्मभूमी आहे.त्यामुळे आगामी लोहा विधानसभेची निवडणूक लढवणार आहे.भाजप माझा निश्चित सन्मान करेल. तसेच भाजप लोहा विधानसभेची जागा शंभर टक्के जिंकणार असल्याचा दावा माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केला आहे.

कंधार शहरातील विविध विकास कामांचा भूमिपूजन व लोकार्पण सोहळा शुक्रवारी, २७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता नगरेश्वर मंदिर मंगल कार्यालय, कंधार येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उमरज मंठ सस्थानाचे मठाधिपती एकनाथ महाराज, पानभोसी मंठ सस्थानाचे मठाधिपती नागेंद्र गयबी महाराज, छत्तीसगडचे भारतजी मडियाल, माजी जि.प.सदस्य प्रविण पाटील चिखलीकर, माजी जि.प.सदस्या प्रणिता देवरे-चिखलीकर, माजी जि.प.सदस्य मनोहर पाटील तेलंग, माजी जि.प.सदस्य बाबुराव गिरे, माजी जि.प.सदस्य गणेश साळवे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष भगवान राठोड, भाजपचे तालुकाध्यक्ष किशनराव डफडे, कंधार कृउबा सभापतीचे संजय देशमुख, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य तुकाराम वारकड, माजी नगराध्यक्षा अनुसया



केंद्रे, माजी नगराध्यक्ष जफरोद्दीन बाहोद्दिन, तहसिलदार रामेश्वर गोरे, गटविकास अधिकारी महेश पाटील, सा.बा.उपविभागाचे अभियंता सुमित पाटील, सहाय्यक अभियंता चमकुरे, कनिष्ठ अभियंता शेबाळे, भाजप महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा जयमंगला औरादकर, भाजप महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा शोभाताई संगनवार, डॉ.रामराव सदावर्ते, ॲड.दिगांबर गायकवाड, डॉ.दिनकर जायभाये आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

याप्रसंगी माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, माझं लोहा-कंधार मतदारसंघाकडे नेहमी लक्ष होतं. सत्तेत असो या नसो मी कधीच मतदारसंघाकडे दुर्लक्ष केलं नाही. इथल्या लोकांनी मला भरभरून आशीर्वाद दिला. जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची संधी दिली. माझ्या खासदारकीच्या काळात हजारो कोटींचा निधी आणला. विविध विकास कामे मार्गी लावले आहेत.

माझ्या एवढा निधी जिल्ह्यात कोणत्याही खासदारांनी आणला नाही. यावेळी माजी जि.प.सदस्य दत्तात्रय चंदनफुले, कंधार कृउबा समितीचे संचालक बालाजी झुंबाड, भाजपचे तालुका सरचिटणीस मधुकर डांगे, भाजपचे शहराध्यक्ष निलेश गौर, ग्रामसेवक संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष गंगाधर कांबळे, माजी नगरसेवक बालाजी पवार, माजी नगरसेविका वंदनाताई डूमणे, भाजप शिक्षक आघाडीचे तालुकाध्यक्ष रामराव वरपडे, भाजप शिक्षक आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष राजहंस शहापुरे, बाळू महाजन, चेतन केंद्रे, शिवाजी लुंगारे, व्यंकट मामडे, शंतणू कैलासे, बाळासाहेब गर्जे, साईनाथ कोळगिरे, दत्ता डांगे, सुनंदा वंजे, कल्पना गित्ते, राजकुमार केकाटे, श्यामसुंदर शिंदे, बालाजी तोरणे, समीर चाऊस, साईनाथ कपाळे, ॲड.सागर डोग्रजकर, मारोती गायकवाड, बालाजी डफडे, बाळू धुतमल, मन्नू इस्माईल, रजत शहापुरे, कैलास नवघरे, शेख असेफ आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष भगवान राठोड यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड.गंगाप्रसाद यन्नावार यांनी केले. तर आभार भाजपचे तालुकाध्यक्ष किशनराव डफडे यांनी मानले. यावेळी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित यावेळी राज्यसभेचे खासदार अजित गोपछडे यांच्या शुभहस्ते कंधार येथील शांतिदूत गोविंदराव पाटील चिखलीकर उद्यान विकसित करणे (३ कोटी), मानसपूरी ते संगुचीवडी इजिमा १०८ (मानसपूरी ते बेलाची महादेव) सीसी रस्ता करणे (५ कोटी), कंधार येथील वीरमाधव नगर ते भगवान बाबा मंदिर सभागृहापर्यंत सीसी रस्ता व नाली बांधकाम करणे (१ कोटी ४७ लक्ष), कंधार येथील स्वप्नभूमी नगर येथे संभाजी केंद्रे ते वारे त गव्हाने यांच्या घरापर्यंत सीसी रस्ता व नाली बांधकाम करणे (१ कोटी १ लक्ष), कंधार येथील जलशुद्धीकरणाची सुधारणा व बळकटीकरण करणे (५५ लक्ष), कंधार येथील खडंकी देवी मंदिर, स्वामी समर्थ मंदिर, विजयगड येथील बौद्ध विहार सभागृह व भगवानबाबा मंदिर, साईबाबा मंदिर, सुलेमान शहा दर्गा येथे संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे (१ कोटी ५ लक्ष), कंधार येथील सिद्धार्थनगर अंतर्गत सीसी रस्ता व नाली बांधकाम करणे (७० लक्ष), प्रभाग क्र.१ मध्ये निवृत्ती वाघमारे,मुंडे,पोचीराम वाघमारे ते निरजगावे व प्रभाग क्र.७ मध्ये डॉ.कागणे, डॉ.केंद्रे यांच्या हॉस्पिटल पर्यंत सीसी रस्ता करणे (१ कोटी ३० लक्ष) आदी १४.१७ कोटींच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले.

### झालेली चुक दुरुस्त करा

**मागील निवडणुकीत सर्वात मोठी चुक झाली होती. आता ती झालेली चुक दुरुस्त करायची आहे. मी २५ वर्षात ४ पक्ष बदलले. परंतु काहींनी ५ वर्षांत ५ पक्ष बदलले. मला त्यांची किव येते. खरंच ते आयएएस अधिकारी होते का? असा प्रश्न पडतो. ज्या पक्षाकडून निवडून आले. त्या पक्षाच्या उमेदवाराला मतदान केलं नाही. कोण किती काम केलं ते लोक ठरवतील. एखादं नारळ आचारसंहितापूर्वी त्यांनी फोडून दाखववावे अशी घणाघाती टीका माजी खा.प्रतापराव चिखलीकर यांनी केली.**

# उमरखेड एसटी आगार मध्ये आंतर राष्ट्रीय माहिती अधिकार दिवस साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

शहरातील एसटी आगारात आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिवस साजरा करण्यात आला. तसेच यवतमाळ विभागात नफ्यात उमरखेड एसटी आगार हे प्रथम क्रमांकावर आल्यामुळे आगार व्यवस्थापक व कर्मचारी यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रम हा श्रीमती किनाके मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून विशाल गीरी सर हे होते तर विशेष उपस्थिती शहीद भगतसिंग न प शाळा क्रं २ चे मुख्याध्यापक अशिष राठोड सर व पत्रकार सिध्दार्थ दिवेकर होते. वरिल मान्यवरांनी या प्रसंगी श्रीमती किनाके मॅडम व कर्मचारी वर्गांचा सत्कार करण्यात आला. प्रस्तावना चनेबोईनवाड यांनी मांडली तसेच मार्गदर्शन करताना विशाल गिरी सरांनी माहिती अधिकार अधिनियम २०२५ बदल



माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात श्रीमती किनाके मॅडम यांनी माहीती अधिकार बाबत व आगारा ची स्थिती सद्या चांगली असून या पुढे आगार नफ्यातच राहील या करिता आपण सर्वांनी प्रयत्नशील व कटिबध्द असणे आवश्यक आहे असे सांगितले. या कार्यकमासाठी भदाडे साहेब स का अ, मनवर साहेब, स वा अ जाधव साहेब, वाह निरी, तसेच पोफाळकर, मनिष दुबे, शफाऊला खाँन, पवार,अ जाधव श्री चेके, चिरंगे, राचयटकर, सौंदनकर, वानखेडे, माळवे, तायडे उपस्थित होते. सुत्रसंचालन श्री चनेबोईनवाड यांनी केल आहे तर आभार श्री उगले यांनी मानले.

# उपविभागीय पोलीस अधिकारी आयुष्मान एकनाथराव पाडळे यांचा सत्कार म्हणजे गृह खात्यातील माणुसकीचा सन्मान होय-डॉ.सावळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ. संभाजीनगर । ज्ञानेश्वर बुधवत**

दि. २३-०९-२०२४- जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा येथे पोलीस निरीक्षक पदी नियुक्त असताना मागील काही दिवसात बदली होऊन छ. संभाजीनगर येथे रुजू झालेले तथा आपल्या कर्तव्यदक्ष आणि सविनय कार्यक्षमतेखातीर लगेचच पदोन्नती मिळून उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून छ. संभाजीनगरलाच नियुक्त झालेले मा. आयुष्मान एकनाथराव पाडळे या एका अत्यंत सहृदय तसेच आपल्या प्रभावी कार्यक्षमतेमुळे विभागातंच नव्हे तर जनमानसात सुध्दा आपली विशेष ओळख निर्माण करणाऱ्या आगळ्या वेगळ्या व्यक्तिमत्वाचा, साहित्यधारा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, छ. संभाजीनगर ( औरंगाबाद ) च्या तर्फे समाज-रत्न या बहुमानाच्या पुरस्कारासह स्मृतिचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ सादर प्रदान करून, स्थानिक हॉटेल मराठा च्या भव्य अशा सभागृहात, मान्यवरांच्या उपस्थितीत हृद्य सत्कार करीत असताना, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा स्कॉटलंड यार्ड स्टुडंट्स ब्रान्ड



म्बेसेडर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अर्थशास्त्र प्राध्यापक डॉ. संघर्ष सावळे यांनी वरीलप्रमाणे उदगार काढले. तसेच डॉ. संघर्ष सावळे यांना सुध्दा अध्यापन क्षेत्रातील बहुमानाचा ' भारत शिक्षण ' पुरस्कार नुकताच प्रदान झालेला असल्याने मान्यवरांच्या हस्ते त्यांचाही हार्दिक सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रम महाराष्ट्रातील दलित चळवळीचे धडाडीचे कार्यकर्ते तथा सम्राट अशोक वृत्तपत्र संपादक, बुलढाणा जिल्हा - मा. सु. मा. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तर आपल्या सात दशकीय निर्भैळ सामाजिक कार्यासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट पदवी प्राप्त तथा ज्येष्ठ साहित्यिक, कवी, गायक, विविध वाद्यवादक, लेखक, अभिनेता, दिग्दर्शक, शाहीर तसेच बहुजन साहित्य संघाचे अध्यक्ष व केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्ली चे राष्ट्रीय कार्यकारी उपाध्यक्ष डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि ज्येष्ठ कवी व सामाजिक क्षेत्रात मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. डी. व्ही. खरात सर, चिखली व साहित्यिक क्षेत्रातील मानद डॉक्टरेट प्राप्त ज्येष्ठ कथाकार व कवी डॉ. बबनराव महामुने, हिवरा आश्रम, मेहकर,छ. संभाजीनगर । ज्ञानेश्वर बुधवतआंतरराष्ट्रीय पर्यावरण संरक्षण संस्था महाराष्ट्र पदाधिकारी ज्येष्ठ कवयित्री आयुष्मती शीतल शेगोकार तथा मा. राष्ट्रपतींच्या हस्ते कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी म्हणून पुरस्कार प्राप्त पोलीस निरीक्षक आयुष्मान चिंचोले इ. मान्यवरांच्या साक्षीने हा सौहार्दपूर्ण सोहळा पार पडला. याप्रसंगी डॉ. बबनराव महामुने, डॉ. खरात, डॉ. कस्तुरे यांनी आपल्या साहित्यप्रचूर वक्तृत्वाने सत्कार मुर्तिंबद्दलची तथा त्यांच्या समाजशील कार्याची माहिती व महती सांगून प्रत्येक माणसाने माणसाला माणसाप्रमाणे ओळखण्याची व वागण्याची कला संवर्धित केली पाहिजे आणि शासकीय, प्रशासकीय किंवा इतर कुठल्याही नोकरीमधील अधिकारी वर्गानेही अशा व्यक्तिमत्वांपासून प्रेरणा घ्यायला हवी असा संदेश दिला. आयुष्मान अंकुश पडघान यांनी गीता द्वारे प्रबोधन केले. या सोहळ्यासाठी आवर्जून उपस्थित नांदूरा, जि. बुलढाणा येथून आलेल्या आयुष्मती मंगलाताई गर्दे, आयुष्मती गोदावरीताई, तसेच ठेकेदार पवन जाधव तथा सौ. प्रिया जाधव, आयुष्मान सुहास जोशी, आयुष्मान बहुरे, आयुष्मान सोनकांबळे, औरंगाबाद इ. मान्यवरांनी उपरोक्त सत्कार मुर्तिंचा शाल व पुष्पगुच्छ देवून हृद्य सन्मान केला. ज्येष्ठ समाजसेवक आयुष्मती वैशाली तायडे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. संस्थेच्या वतीने सुरूचीभोजनाचे आयोजन सुध्दा करण्यात आले.

# मा.श्री शरद गढीकर राज्यस्तरीय कै.बाबारावजी वायलाजी बुंदेले शैक्षणिक पुरस्काराने सन्मानित

## कै.मैनाबाई बाबारावजी बुंदेले स्मृती प्रतिष्ठानचा उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अमरावती । प्रतिनिधी**

संत रविदास सांस्कृतिक भवन,सर्वोदय कॉलनी, अमरावती येथे दि.२२ सप्टेंबर २०२४ ला कै.मैनाबाई बाबारावजी बुंदेले स्मृती प्रतिष्ठानचा पुरस्कार वितरण संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सुधीर महाजन,सत्कारमूर्ती राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मा.श्री शरद गढीकर,प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभंगकार प्रा.अरुण बुंदेले, प्रमुख अतिथी मधुकरराव अभ्यंकर,लेखक प्रा.श्रीकृष्ण बनसोड,प्रा.डॉ.उज्वला मेहरे, समाजसेविका डॉ.राजिया लताना,प्रा.डॉ. संजय खडसे, सुरेशराव मेहरे, कविता पाचघरे होते.

अध्यक्ष,प्रमुख अतिथी तसेच कै.मैनाबाई बाबारावजी बुंदेले स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.अरुण बुंदेले यांनी युवा कार्य,तंटामुक्ती कार्य,क्रीडा क्षेत्रातील कार्य,युवा पत्रकार, कार्य,समाजकार्य,शैक्षणिक कार्य करणारे,राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मा.श्री शरद वसंतराव गढीकर यांचा



शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ,पुरस्काराचे सन्मानपत्र आणि प्रा.बुंदेले लिखित अभंग तरंग व प्रा.बनसोड लिखित महात्मा फुले व अस्पृश्यांची कैफियत ही पुस्तके देऊन राज्यस्तरीय कै.बाबारावजी वायलाजी बुंदेले शैक्षणिक पुरस्कार -२०२४ हा पुरस्कार सन्मानपूर्वक बहाल करण्यात आला.

याप्रसंगी मान्यवरांनी मनोगतातून प्रा.अरुण बुंदेले आई-वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ करीत असलेले कार्य हे अनमोल आहे.आईंच्या नावे स्थापन केलेल्या प्रतिष्ठानद्वारे दरवर्षी अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र स्मृतीचिन्ह व पुस्तक देऊन ते गौरव करतात तसेच समाजातील विविध क्षेत्रातील गुणवंतांना आई-वडिलांच्या नावे पुरस्कार देऊन ते सन्मानित करतात. त्यांचे हे कार्य वाखाणण्यासारखे आहे असे विचार व्यक्त केले आणि पुरस्कार प्राप्त मा.श्री शरद गढीकर यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले.

सत्कारमूर्ती मा.श्री शरद गढीकर यांनी पुरस्कार दिल्याबद्दल प्रतिष्ठानचे आभार मानले.

मा.श्री शरद गढीकर हे दि.२२ सप्टेंबर २०२४ रोजी राज्यस्तरीय कै.बाबारावजी वायलाजी बुंदेले शैक्षणिक पुरस्कार - २०२४ या पुरस्काराने सन्मानित झाल्यामुळे त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.अरुण बुंदेले,संचालन प्रा.डॉ.संजय खडसे तर आभार रजनी आमले यांनी मानले.प्रकाशन समारंभाला रसिकांची भरपूर उपस्थिती होती.

### विविध संस्थांचे पदाधिकारी

**मा.श्री शरद गढीकर हे साई बहुउद्देशीय संस्था अमरावतीचे अध्यक्ष आहेत तर प्रभात क्रीडा मंडळ जिल्हा टेनिक्कॉईट असोसिएशनचे सचिव आहेत तसेच अमरावती जिल्हा जम्परोप असोसिएशन, अमरावती जिल्हा शारीरिक शिक्षक संघटना,श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ,नेहरू युवा केंद्र (क्रीडा व खेल मंत्रालय ),अमरावती जिल्हा भाषाध्यापक संघ,अमरावती जिल्हा सायकलींग असोसिएशन,अमरावती जिल्हा जलतरण संघटना,क्रीडा भारती इत्यादी संस्थाचे ते सदस्य आहेत.**

### क्रीडाक्षेत्रातील यश

**मा.श्री शरद गढीकर हे चंद्रभानजी विद्यालय,कुंड सर्जापूर,ता.जि.अमरावती येथे सहाय्यक शिक्षकाच्या पदावर कार्यरत आहेत.आजपर्यंत त्यांनी सॉफ्टबॉल व बेसबॉल या खेळातील ५५० हून अधिक राज्यस्तरीय व २५ हून अधिक राष्ट्रीय खेळाडूंना ग्रामीण भागातून तयार केले असून त्यापैकी दहा खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण,रौप्य, कास्य पदके महाराष्ट्राला मिळवून दिली आहेत. ते महाराष्ट्रातील अनेक दैनिक,साप्ताहिक व इ - पेपर मध्ये क्रीडाक्षेत्रातील व विविध विषयावर लेख प्रकाशित करून समाजप्रबोधन व शैक्षणिक प्रबोधन करतात. पत्रकारितेतही त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे व करीत आहेत.**

### विविध पुरस्कारांनी सन्मानित

**विविध संस्थांच्या पदावर कार्यरत असताना केलेल्या त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्यामुळे त्यांना आजपर्यंत विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४, उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार,क्रीडा व खेल मंत्रालय भारत सरकार तर्फे जिल्हा युवा पुरस्कार,महाराष्ट्र शासनाचा महात्मा गांधी तंटामुक्ती राज्य पुरस्कार,जिल्हा गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार,अरविंदबाबू देशमुख उत्कृष्ट क्रीडा पत्रकारिता पुरस्कार, स्व.अनिल मोहरील राज्यस्तरीय क्रीडा पत्रकार पुरस्कार( प्रथम ) इत्यादी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले.**

# तुमच्या मनात जो आहे तोच उमेदवार असेल जयंत पाटील यांची अप्रत्यक्षपणे राहुल जगताप यांनाच पसंती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

राज्यातील अनेक कारखानदार सरकारच्या राजकीय आमिषाला बळी पडले. एनसीडीसीचे कर्ज घेण्यासाठी एक तर शरद पवार यांची साथ सोडली नाही तर सरकारच्या पक्षात सामिल झाले. पण श्रीगोंद्याचा राहूलदादा जगताप या पठ्याचा आम्हाला अभिमान आहे, त्यांनी सत्तेपुढे मान झुकवली नाही या शब्दात खासदार अमोल कोल्हे यांनी राहूल जगताप यांचे कौतुक करताना त्यांच्या पाठीवर थाप टाकली. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने आयोजीत शिवस्वराज्य यात्रा गुरुवारी श्रीगोंद्यात पोचली. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या सभेसाठी मोठी गर्दी होती. अध्यक्षस्थानी नागवडे कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब भोस होते. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जंयत पाटील, खासदार अमोल कोल्हे, खासदार नीलेश लंके, युवकचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, अतुल लोखंडे, दीपकपाटील भोसले, हरिदास शिर्के, केशवराव मगर, जिजाबापु शिंदे आदी उपस्थितीत होते.

यावेळी खासदार कोल्हे म्हणाले. राज्यातील अनेक कारखान्यांना थकहमी देण्यात आली. कर्ज बसत नसतानाही काही कारखान्यांना ते देण्यात आले. पण कुकडी सहकारी साखर कारखाना, घोडगंगा सहकारी साखर कारखाना यांना मात्रनियमात असतानाही ते नाकारण्यात आले. ज्यांनी फाईल अडवली त्यांनी उत्तर दिले पाहिजे. त्यांना काय हवे होते हे सगळ्यांना माहिती आहे. पण आम्हाला राहूल दादा जगताप यांचा अभिमान आहे. त्यांन साहेबांची साथ सोडली नाही. सरकारच्या सत्तेपुढे मान झुकवली नाही.खासदार कोल्हे म्हणाले, आगामी विधानसभा निवडणूकीत ते दाखवून द्यायचे आहे. अनेक प्रलोभने येतील, अनेक मतमंतात्तरे होती, पण शेतकऱ्यांचे भले करणारे, महाराष्ट्राचा स्वाभीमान जपणारे, तरुणांचे हित जोपासणारे सरकार सत्तेत यावे. त्यासाठी शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखालील महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आणा आणि त्यासाठी श्रीगोंद्यातून महाविकास



आघाडीचा उमेदवार जिंकुन द्या असे आवाहन कोल्हे यांनी केले

तुमच्या मनातीलच उमेदवार असेल..... जयंत पाटील राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले, एकदा लाट आली की, पैशाला महत्व नसते. तुम्ही ते लोकसभेला दाखवून दिले. मतदारांच्या मनात जे असते तेच करुन दाखवितात. लोकसभेपुर्वी आमच्या पक्षाला कोणी मोजत नव्हते पण मतदारांनी दाखविले आणि आता आमच्या पट्टयात कार्यक्रम आला आहे. आम्हाल मानणाऱ्या नेत्यांचे कारखान्यांना कर्ज देताना खड्यासारखे बाजूला काढले. पण शरद पवार यांनी आता कुकडीचा प्रश्न सोडला आहे. त्यामुळे कुठलाही निगेटिव्ह मुद्दा राहिलेला नाही. तुमच्या मनात जो आहे तोच येथील उमेदवार असेल, काळजी करु नका फक्त महाविकास आघाडीची चौकट ठरल्याने मी नाव जाहीर करु शकत नाही असे सांगत जयंत पाटील यांनी अप्रत्यक्षपणे राहूल जगताप यांना पसंती दिली.कुकडीचे थकीत ५ तारखेपूर्वी अदा करणार– राहूल जगताप जगताप म्हणाले, एनसीडीसीचे कर्ज कुकडी कारखान्याला मिळत होते पण केव ळ आम्ही साहेबांसोबत आहोत म्हणून आम्हाला डावलले. पण आम्ही साहेबांची साथ सोडणार नाही. कुकडीची अडचण पवार साहेबांनीच सोडवली असून येत्या ५ आक्टोंबरपर्यंत सगळी थकीत देणी अदा करण्यात येतील. आमच्यावर बुल डोजर जरी फिरवला तरी आम्ही पवार साहेबांना सोडणार नाही. विधानसभेला ५० हजार मतांचे लिड घेवून महाविकास आघाडीचा उमेदवार जिंकेल. फक्त नेत्यांना एक विनंती आहे. जे आपल्यासोबत कायम आहेत, लोकसभेला जे सोबत राहिले त्यांनाच सोबत ठेवा. त्याच लोकांचा विचार करावा असे आवाहन ही जगताप यांनी केले जवळपास आघाडीचे उमेदवार राहुल जगतापच ठरले आहेत त्यामुळे आघाडी चे इच्छुक उमेदवार साजन पाचपुते व घनश्याम शेलार यांची भूमिका काय असणार आहे यावरून पुढचे गणीत ठरणार आहे त्यामुळे या दोन्ही दिग्गज नेते काय भूमिका घेतात याकडे संपूर्ण मतदारसंघांचे लक्ष लागले आहे .

# पिंपळवाडी येथे पोषण महाअभियान आहार प्रदर्शन प्रात्यक्षिकाचा अर्पिता

## ठुबे आयएएस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | अण्णासाहेब साबळे**

दिनांक २१सप्टेंबर रोजी पिंपळवाडी येथे पोषण अभियाना निमित्ताने आहार प्रदर्शन प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम प्रशिक्षणार्थी ख–ड अधिकारी अर्पिता ठूबे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.यावेळी बाल विकास प्रकल्प अधिकारी मा.श्री.प्रभाकर अनंत्रे साहेब,मा.डॉक्टर कदम सर,मा.डॉक्टर काकड सर,
सी एच ओ सारंग मॅडम,डॉक्टर दराडे मॅडम पी एच सी चा स्टाफ जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक केंद्रप्रमुख जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक शिक्षिका आणि विद्यार्थी हजर होते.बाळाचे १००० दिवस,मुलांच्या मेंदूची वाढ आणि विकास,आहार हीच औषधी या विषयावर पर्यवेक्षिका बडे यांनी मार्गदर्शन केले. गावच्या सरपंच श्रीमती शोभाताई बहिरवाळ ह्या अध्यक्ष स्थानी होत्या तसेच ग्रामपंचायत चा स्टाफ हजर होता.चरटा विभागातील पिंपळवाडी येथे पोषण महाअभियान निमित्ताने आहार प्रदर्शन प्रात्यक्षिकेचा कार्यक्रम घेण्यात यावेळी अंगणवाडी सेविका हजर होत्या. श्रीमती रमा खोड मॅडम. श्रीमती नागिसे पर्यवेक्षिका हजर होत्या.प्रशिक्षणार्थी ख–डश्रीमती अप्रिता ठुंबे मॅडम, डॉक्टर कदम सर,बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रभाकर अनंत्रे साहेब,विस्तार अधिकारी रमा खोड मॅडम,युवा नेते सुभाष बहिरवाळ उपस्थित होते अंगणवाडी सेविका,मदतनीस,विद्यार्थी यांना पोषण आहार या विषयावर मार्गदर्शन केले.प्रर्यवेशिका बडे मॅडम नागिसे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम घडून आणला यावेळी सूत्रसंचालन बाळासाहेब कळसाने यांनी केले.

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर

# दोन शेतकरी सदस्यांना खो अठ्ठावीस पैकी पंचवीस सदस्यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर २८ सदस्य नियुक्त करण्यात येणार होते. , पण यातील शासकीय व अशासकीय आशा २५ जणांची नियुक्ती करून आणि मनाचा मोठेपणा दाखवून मात्र शेतकरी प्रवर्गातून शासनाच्या जाहिरातींमध्ये दोन जागा रिक्त ठेवण्यात आल्या , त्या कोणासाठी ? दोन ( २ ). शेतकरी सदस्यांना खो देऊन पंचवीस सदस्यांची निवड केल्याने जिल्ह्यात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर निवडीबद्दल तर्कशास्त्र चालवताना दिसत आहेत.

महाराष्ट्र शासन शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी विविध प्रकारच्या समिती वर स्थान देत आहे. मात्र स्थानिक पातळीवरील प्रशासन शेतकऱ्यांना सहकार्य करण्या ऐवजी मिठाच्या खड्याप्रमाणे बाजूला ठेवून नुकत्याच. ग्राहक संरक्षण परिषदेवर सदस्य नियुक्त करण्यात आले . शेतकरी पुत्रावर मोठा अन्याय होताना पहावयास मिळत आहे.

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर आठाविस सदस्य नियुक्त करावयाचे होते व शेतकरी प्रवर्गातुन जाहिरातीमध्ये दोन जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या व त्या जागेसाठी शेतकऱ्यांनी अर्ज देखील केला होता. पण जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी निवड प्रक्रिया पूर्ण करून २३ सप्टेंबर रोजी निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रकाशित करण्यात आली परंतु ही यादी शेतकरी प्रवर्ग वगळून यादी लावण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी विविध ठिकाणी शेतकऱ्यांना समाविष्ट करून सक्षम बनवण्याचे काम करत आहे .मात्र प्रशासन शेतकऱ्यांना सहकार्य करण्या ऐवजी मिठाच्या खड्याप्रमाणे बाजूला करून ग्राहक संरक्षण परिषदेवरील सदस्य नियुक्त करण्यात आले शेतकरी मोठा असो लहान शेतकऱ्यांरी हवामान बदलामुळे परेशान झाला आहे. त्यातच शासनाने नियम बाजूला करून अधिकारी आपली मनमानी करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे ग्राहक संरक्षण परिषदेवरील खालील सदस्य निवड करणे बंधनकारक होते शासकीय सदस्य जिल्हा परिषद .मनपा .नगरपालिका. पंचायत समिती .कृषी उत्पन्न बाजार समिती .ग्राहक संघटना. शाळा महाविद्यालय. वैद्यकीय व्यवसाय. व्यापार व उद्योग. पेट्रोल व गॅस. व शेतकरी वरील सदस्य निवड करतेवेळी प्रशासनाने शेतकरी प्रवर्ग वगळून निवड प्रक्रिया पूर्ण केली प्राधान्याने शेतकरी प्रवर्गांमधून निवड करून शेतकऱ्यांना सन्मानित करण्याऐवजी शेतकऱ्यांना वगळून निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात आली शासन शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी विविध योजनेवर सबसिडी देत आहे पण प्रशासन शेतकऱ्या बाबतीत उदासीन असल्याचे चित्र दिसून आले आहे

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या लोहा तालुकाध्यक्षपदी विशाल दिनेशराव घंटे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**

लोहा शहरातील उच्च विद्या विभूषित पत्रकार म्हणून परिचित असलेले आपल्या लेखणीच्या आधारावर समाजातील शोषित पिढीत व दिन दुबळे यांच्या प्रश्नावर न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करीत असलेले पत्रकार म्हणून ते काम करत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून मास्टर ऑफ आर्ट ही पदवी पूर्ण केली व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून बॅचलर ऑफ एज्युकेशन व बॅचलर ऑफ जर्नोलिझम पूर्ण केले. व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघात गेल्या अनेक दिवसापासून ते कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, राज्य संघटक संजय भोकरे, राज्य



सरचिटणीस विश्वासराव आरोटे, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांच्या आदेशाने जिल्हाध्यक्ष संग्राम पाटील मोरे व निवड समिती जिल्हाध्यक्ष मोहन पाटील पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन त्यांची लोहा तालुकाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# जरांगे एकही उमेदवार उभा करणार नाही:मी बाँड पेपरवर लिहून देतो–हाके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जालना (वृत्तसंस्था**

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी करणाऱ्या मनोज जरांगे पाटलांवर निशाणा साधला. मनोज जरांगे यांची शरद पवार व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी कमिटमेंट झाली आहे. त्यामुळे ते आगामी विधानसभा निवडणुकीत एकही उमेदवार उभा करणार नाहीत. हे मी बाँड पेपरवर लिहून देतो, असे ते म्हणालेत. मनोज जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी जालन्याच्या आंतरवाली सराटीत उपोषण सुरू केले होते. ते त्यांनी बुधवारी मागे घेतले. त्यानंतर लक्ष्मण हाके यांनी आंतरवाली सराटीपासून जवळच असलेल्या वडीगोद्री येथील आपले उपोषणही मागे घेतले. या पार्श्वभूमीवर लक्ष्मण हाके यांनी शुक्रवारी पुन्हा जरांगेंवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेशी कमिटमेंट झाली आहे. त्यामुळे ते आगामी विधानसभा निवडणुकीत आपला एकही उमेदवार देणार नाहीत. हे मी बाँडपेपरवर लिहून देतो. लक्ष्मण हाके म्हणाले, मनोज जरांगे यांच्या बैठकीत वाळू माफिया व दोन नंबरचे धंदे करणारे असतात.

# विकासाचा महामंत्र देण्यासाठी आज कवळे गुरुजी सूजलेगांव ता नायगांव गावात





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**

स्वतःच्या कार्यकर्तृत्वाच्या बळावर नावारुपाला आलेल कर्तबगार नेतृत्व म्हणजे आदरणीय 'कवळे गुरुजी'!

कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसणाऱ्या एका सर्वसाधारण कुटूंबातील युवक ते हजारों बेरोजगारांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून देणारा यशस्वी उद्योजक, सर्वसामान्यांच्या मनाला भिडलेला जनप्रिय नेता असा कवळे गुरुजींचा प्रवास सर्वांनाच अचंबित करणारा आहे. कवळे गुरुजी यांना कोणताही राजकीय वारसा नसणाऱ्या एका सर्वसाधारण कुटूंबात गुरुजी लहानाचे मोठे झाले.घरची आर्थिक परिस्थिती जेमतेमच.उमरी तालुक्यातील सिंधी हे गुरुजींचे जन्मगाव.विकासाची दृष्टी असणारा, सर्वसामान्यांच्या समस्यांविषयी खराखुरा कळवळा असणारा गुरुजींसारखा एक लोककल्याणकारी नेता आकाराला येतो आहे हे आपल्यासाठी आनंददायी आहे.परंतू गुरुजींचा राजकीय प्रवास समजून घेतल्यानंतर एक बाब आपल्याला नक्कीच लक्षात येईल हजारो शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी कारणीभूत ठरलेले उद्योगविश्व आणि स्वतः चे ठळक असे अस्तित्व गुरुजींनी स्वकर्तृत्वावर निर्माण केले आहे.आज नायगाव विधानसभा मतदारसंघात हेवा वाटावा एवढा मोठा उद्योगसमूह गुरुजींनी निर्माण केला आहे.गुरुजींच्या या उद्योगविस्तारात आज रोजी ४५०० हजार कूंटूंबियाचा उदरनिर्वाह गुरुजींच्या समूहात चालतो. ही यशस्वी वाटचाल निश्चितपणे कौतुकास्पद आहे.गुरुजींकडे असणारी विद्वता,अप्रतिम व्यवस्थापन कौशल्य आणि त्यांचे उत्कृष्ट नियोजन या त्रिसूत्रीच्या बळावर गुरुजींनी हे सर्व शक्य करून दाखवले आहे.

प्रारंभीच्या काळात काही काळ गुरुजींनी शिक्षक म्हणूनही काम केले आहे.शिक्षकाचे आयुष्य तसे कम्फर्टेबल. परंतू सर्वसामान्यांच्या समस्यांविषयी अंतरिक तळमळ असणारे गुरुजी शिक्षक नावाच्या प्रोफेशनमध्ये समाधानी नव्हते. शेतकरी, कष्टकरी व जनसामान्यांचे जीवन आर्थिकदृष्ट्या उन्नत व्हावे अशी प्रबळ इच्छा हेच गुरुजींनी राजकारणात पदार्पण करण्याचे मुख्य कारण आहे. व्हीपीके उद्योग समूहाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गुरुजी सातत्याने प्रयत्नशील आहेत.नायगाव विधानसभा मतदार संघातील हजारो बेरोजगार तरुणांना अर्थार्जनाचे साधन उपलब्ध करून देत त्यांचे जीवनमान उंचावण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. आपल्या उद्योग समूहाच्या माध्यमातून अनेक लोककल्याणकारी निर्णय घेत सर्वसामान्यांचा विश्वास गुरुजींनी संपादित केला आहे.महत्वाचे म्हणजे गुरुजींनी सर्वसामान्यांचं जगणं प्रत्यक्ष अनुभवलेलं आहे.शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, सर्वसामान्यांच्या अडीअडचणी,व्यथा गुरुजींनी अगदी जवळून पाहिल्या आहेत.शेती आणि मातीशी घट्ट नातं जपणारा गुरुजींसारखा लोकाभिमुख नेता आपल्या नांदेड जिल्ह्याला लाभला हे आपलं भाग्य समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन सर्वांचे कल्याण व्हावे यासाठी गुरुजी प्रामाणिकपणे आणि अविरतपणे प्रयत्नशील आहेत.कोणताही भेदभाव न करता सर्वांचे जगणे समृध्द व्हावे अशी त्यांची सर्वसमावेशक दृष्टी आहे. गुरुजींचे राजकीय भविष्य निश्चितपणे उज्वल असणार आहे याबाबत कोणाच्या मनात काही दुमत असण्याचे काही कारण नाही. आपल्यासारख्या अनेकांना प्रेरणास्रोत असणारे कवळे गुरुजी..कै. डॉ.शंकररावजी चव्हाण साहेब यांच्या आशीर्वादाने उमरी तालुका हा सिंचनाचा तालुका म्हणून ओळखला जातो. मागच्या काळात या भागात कारखाना सुरू नसल्याकारणाने तालुक्यात ऊसाची लागवड होत नव्हती. परंतु आता या भागात व्हिपीके, एमव्ही के, व डॉ.शंकराव चव्हाण असे तीन यूनिट उमरी तालुक्यात शेतकऱ्यांचा हिताच्या दृष्टीने नायगांव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांनी उभारल्याने या भागात कारखान्याच्या निमित्ताने शेतक– यासाठी मोठी कामधेनूच ठरली आहे.

यावेळी समवेत, सुजलेगांवचे गावचे शाहीर दिगू तुमवाड, उत्तमराव पाटील शेळगावकर, रावसाहेब अनेराये,सुजलेगावचे सरपंच दत्तात्रय आईलवाड, सुधाकर बकवाड उपसरपंच, दत्तात्रय पांचाळ, आरळक पाटील बकवाड, शाहीर बळीराम जाधव, माधवजी कुराडे, विठ्ठलराव कस्तुरे, वैभव बकवाड, शिवाजी कंदकुर्ते, हनुमंत गुंतापले, बाबुराव इबितवार, हनुमंतराव देशमुख, संतोष पाटील शिंदे, भगवानराव संगेपवाड कार्यक्रमाचे आयोजन एन.बी कदम, संभाजी सजन सूजलेगांव यांनी केले यावेळी सुजलेगांव ता नायगाव गावातील असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904